# एस. एम. जोशी विद्यालयात क्विक हील फाउंडेशनच्या वतीने सायबर जनजागृती

पुणे, प्रतिनिधी : महादेवनगर येथील एस. एम. जोशी विद्यालयात, क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स यांच्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्डचे महत्व, डिजिटल गोपनीयता तसेच सुरक्षित इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्राचे सादरीकरण अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या आश्लेषा दामगुडे आणि वेदिका अकोटकर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवादात्मक पद्धतीने सायबर सुरक्षेचे विविध पैलू समजावून सांगितले. त्यांच्या सादरीकरणाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लंगोटे मॅडम यांनी या उपक्रमाचे स्वागत करून विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता सांगितली. त्यांनी क्विक हिल फाउंडेशन, अण्णासाहेब मगर महाविद्यालय आणि सायबर वॉरियर्स यांच्या कार्याचे कौतुक करत आश्लेषा दामगुडे व वेदिका अकोटकर यांचे विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेचे नियम पाळण्याचा संकल्प केला. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे , उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्रचार्य शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख विलास वाणी, प्रा. मनिषा गाडेकर यांनी सायबर वॉरियर यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

